## नमुना दोन

पत्र क्र /यजिप/शिवि. /खाप्राशा/234 /२०२३
कार्यालय शिक्षण विभाग (प्राथमिक)
जिल्हा परिषद, यवतमाळ
दिनांक -: 21/04/2023

प्रति,

१)अध्यक्ष -

२)मुख्याध्यापक- डी.ए.व्ही. पब्लिक स्कुल, सुदंरनगर
निलजई ता. वणी जि. यवतमाळ

विषय — बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम , २००९ यांच्या कलम १८ च्या प्रजोजनार्थ , बांलकाना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम , २०११ याच्या नियम ११, पोट-नियम (४) अन्वयक शाळांना मान्याता प्रमाणपत्र देण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये **दिंनाक १३/०४/२०२३** च्या अर्जाच्या सदर्भांत आणि त्यांनतर या सदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यावहार / शाळेच्या केलेल्या तपासणी चे आधारे

मी शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, यवतमाळ दि. **१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२६** पर्यत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता १ ली ते ८ वी करीता उपरोक्त शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे-:

१. मान्यतेचा कालावधी वाढवुन मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम , २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट् बांलकाना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम , २०११ (जोडपत्र दोन) मधिल तरतुदीचे , शाळा , पालन करील.

३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बांलाकाना, पहिल्या इयत्तेत , त्या इयत्तेतील विदयार्थी संख्येच्या किमाण २५% मर्यादेपर्यत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत सक्तीचे शिक्षण देईल पंरतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्ताच्या बाबतीत देखील या प्रमाणाचे अनुपालक करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाचा कलम १२(२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल. अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५. संस्था/ शाळा कोणतीही फी वसुल करणार नाही आणि कोंणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता पित्यास किंवा पालकास भाग पडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी , धर्म जात किंवा वंश जन्म ठिकाण किंवा यापैकि कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही .

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणर नाही किंवा प्राथकि शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेतुन काढुन टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उतीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास , नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकंलाग / विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्याचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारित केलेल्या किमान अर्हता धारण करणा-या शिक्षंकाची नियुक्ती करण्यात येईल. पंरतु आणखी असे कि, अधिनियाच्या प्रांरभाच्या दिनांकास किमाण अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.



Scanned with CamScanner

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत: गुतंवुण घेऊ नये याची सुनिश्चीती शाळा करील.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमांच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमांचे पालन करील.

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विदयार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिदिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ
- एकुण बांधकाम क्षेत्र
- खेळाच्या मैदानाच्या क्षेत्रफळ.
- वर्गखोल्याची संख्या
- कार्याल नि भंडार नि मुख्याध्यापकाची खोली
- मुलांसाठी व मुलीसाठी स्वंतत्र प्रसाधन गृहे जे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपा कघर
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय याची उपलब्धता
- वाचन साहीत्य विनासायस उपलब्धता

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र , चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत व इतर बांधकाम किंवा क्रिंडागण हे केवळ शिक्षणाच्या केवल कौशल्या विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील .

१३. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम , १८६० (१८६० चा २१) किंवा मुबंई सार्वजनिक वि वस्त व्यवस्ता अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या , गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही .

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्र तयार करावीत . प्रत्येक एका विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षाणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी .

१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेताक ----------------------असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्र व्यवहार करताना कृपया तो नमुद करावा , याची नोंद घ्यावी

१७. शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निंरतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजाकरीता त्रुटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनाचे पालन करावे.

१८. सस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र ‘ तीन’ नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद यवतमाळ

Scanned with CamScanner